# जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद

## (गौण खनिज विभाग)

---

जा.क्र. २०१९/मशाका-२/गौ.ख./प्र.क्र.०१ दिनांक :- २७ मार्च, २०२०.

# जाहीर सुचना

जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद यांच्याकडुन सर्व जनतेस कळविण्यात येते की, औरंगाबाद जिल्हयातील वाळु गटांच्या राज्यस्तरीय पर्यावरण समितीची (SEAC व SEIAA) अनुमती मिळविण्यासाठी अर्ज सादर करावयाचे आहेत. त्याकरिता जिल्हयातील वाळुगट निश्चित करण्यात आले असुन उपलब्ध संसाधनाच्या आधारे जिल्हा सर्वेक्षण अहवाल (District Survery Report) तयार करण्यात आलेला आहे. केंद्र शासनाच्या पर्यावरण, वने व वातावरण बदल, मंत्रालय नवी दिल्ली यांनी जानेवारी २०२० मध्ये प्रसिध्द केलेल्या वाळु / रेती उत्खनन व मार्गदर्शक सुचनेनुसार (Enforcement And Monitoring Guidelines for Sand Mining 2020) सदर अहवाल (District Survery Report) जनतेच्या माहितीकरिता व अभिप्राय (Comments) नोंदविण्याकरिता www.aurangabad.nic.in या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आलेला आहे. सदर अहवालातील (District Survery Report) रेती घाटांच्या लिलावाच्या अनुषंगाने नागरिकांचे अभिप्राय / सुचना असल्यास ३ प्रतिसह गौण खनिज विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय औरंगाबाद येथे किंवा dmo2016.aurangabad@gmail.com या इमेलवर ३० दिवसाच्या आत नोंदवावे.

दिनांक :- २७ मार्च, २०२०.

(भानुदास पालवे)
अपर जिल्हाधिकारी, औरंगाबाद.

Scanned with CamScanner